|| न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ||

श्री . बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबप . संचलित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी . एड् . ), अशोकराव माने

## विद्यानगर, पेठ वडगाव .

ता . हातकणंगले जि . कोल्हापूर

बी . एड् . सेमिस्टर भाग - 1

प्रात्यक्षिक नाव - Tutorial.

विषय - समकालीन भारत आणि शिक्षण.

प्रेरणा स्थान - प्र. प्राचार्या. सौ. निर्मळे आर. एल.

छात्राध्यापकाचे नाव - कु. चौगुले अमृता अशोक.

मार्गदर्शकाचे नाव - प्रा. सौ. शिरनोडे व्ही. एल.

रोल नंबर -

शैक्षणिक वर्ष - 2022-023.

मार्गदर्शक स्वाक्षरी

प्राचार्य स्वाक्षरी

Page No.:
Date: / /

9) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन म्हणजे काय?ते सांगून शिक्षणाचा हक्क स्पष्ट करा.

* प्रस्तावना:-

बालविकास एकात्मिक योजना व सर्व शिक्षा अभियान यांच्या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय साध्य करण्यात येईल. प्रो. यशपाल यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सन २००५ मध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यावरून शासकीय पातळीवर पहिल्यांदाच ज्ञानरचनावादाचा स्वीकार करण्यात आला. बालकेंद्रित अध्ययन-अध्यापनामुळे दुर्बल घटकांचेही ज्ञान समृद्ध होऊन पर्यायाने शिक्षणाचे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य होण्यास पोषक ठरणार आहे.

विद्यार्थ्यांचा बोधात्मक, भावनात्मक व क्रियात्मक उद्दिष्टांचे मूल्यमापन होण्याच्या दृष्टीने सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनची योजना शिक्षणाचा हक्क अधिनियमाच्या २९ व्या कलमानुसार आज शिक्षणामध्ये स्वीकारण्यात आली आहे.

* सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन:-

संकल्पना:-

9) सातत्यपूर्ण मूल्यमापन:-

सातत्यपूर्ण म्हणजे नियमित घडणारी गोष्ट होय. शैक्षणिक उद्दिष्टांच्या पूर्तीचा शोध घेण्यासाठी औपचारिक व अनौपचारिक वातावरणात सहजपणे केलेले मूल्यमापन व विद्यार्थी निहाय ठेवलेल्या नोंदी यास सातत्यपूर्ण मूल्यमापन म्हणता येईल.

2) सर्वकष मूल्यमापन:-

पारंपारिक परीक्षा पद्धतीत फक्त बौद्धिक क्षमतांचेच मापन केले जात असे. परंतु बोधात्मक, भावात्मक, व क्रियात्मक क्षेत्रातील क्षमता या एकमेकांस पूरक असून त्यांचा एकात्मक स्वरूपात विकास होणे अपेक्षित असते. या तीनही क्षेत्रांचा वस्तुनिष्ठपणे घेतलेला आढावा म्हणजे सर्वकष मूल्यमापन होय.

यावरून, व्यक्तीमत्वाच्या तीनही घटकांचे वारंवार निरीक्षण करून नोंदी ठेवल्या आणि त्याचे मूल्यमापन केले तरच ते सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन होईल.

## * सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची उद्दिष्ट्ये :-

१) मूल्यमापनाला अध्ययन - अध्यापनाच्या एकात्म भाग बनविणे.
२) नैदानिक चाचण्या व उपचारात्मक अध्यापन यातून विद्यार्थ्यांचा विकास घडवून आणणे.
३) विद्यार्थ्याला अध्ययन संपादणुकीविषयी योग्य प्रमाणात देणे.
४) विद्यार्थी, अध्ययन - अध्यापन प्रक्रिया, अध्ययन वातावरण या संदर्भात निष्कर्ष व अंदाज बांधण्यासाठी आणि वेळेवर निर्णय घेण्यासाठी साहाय्य करणे.
५) शिक्षक व विद्यार्थी यांना स्वयंमुल्यमापनाची संधी उपलब्ध करून देणे.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधने व तंत्रे.

- नैदानिक चाचणी व स्तर
- स्वाध्याय व वर्गकार्य
- प्रकल्प
- उपक्रम व कृती
- दैनंदिन निरीक्षण.
- तोंडी परिक्षा.
- प्रात्यक्षिक चाचणी
- घटक चाचणी / सत्र / वार्षिक परिक्षा.

## * सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचे फायदे :-

१. विद्यार्थ्यांच्या बोधात्मक क्षेत्रातील उद्दिष्टांबरोबरच भावात्मक व क्रियात्मक क्षेत्रातील उद्दिष्ट्ये किती प्रमाणात साध्य झाली हे पाहता येते.
२. वर्षभर औपचारिक व अनौपचारिक मूल्यमापन होत असल्याने विद्यार्थी नियमितपणे अभ्यास करू लागतात.
३. कार्यानुभव, चित्रकला, शारिरिक शिक्षण या विषयांना यथायोग्य स्थान मिळाल्याने संबंधित शिक्षकांना प्रेरणा मिळण्यास मदत होते.
४. छंद व सवयींची औपचारिक दखल घेतल्याने पालकही मुलांची तयारी त्या दृष्टीने करून घेतील. पालकांना आपल्या पाल्याची प्रगती समजण्यास मदत होते.
५. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टिने शिक्षक वर्षभर अध्यापन व इतर उपक्रमांबाबत दक्ष राहू लागतील.
६. वर्षभर मूल्यमापन होत असल्याने विद्यार्थ्याला शिकण्याची प्रेरणा मिळते विद्यार्थ्याला वार्षिक परीक्षेची वाटणारी भिती कमी होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांच्या कामगिरीची नोंद घेतल्याने त्यांचा आत्मविश्वास

वाढण्यास मदत होते.

## * शिक्षणाचा हक्क:- (Rights of Education):-

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामुळे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम लोकसभेत ४ ऑगस्ट २००९ रोजी संमत केला गेला. हा अधिनियम १ एप्रिल २०१० पासुन जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण भारतात लागू करण्यात आला. कायद्यामध्ये एकूण कलमांचा समावेश करण्यात आला आहे.

## * शिक्षणाचा हक्क २००९ अधिनियमातील प्रमुख तरतुदी:-

१. कलम चार नुसार ६ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या मुलांना त्यांच्या वयाला अनुसरुन योग्य वर्गात प्रवेश घेण्यात येणार आहे.
२. कलम दहा नुसार प्रत्येक पालकाने आपल्या मुलास नजीकच्या शाळेत नाव दाखल करणे हे त्यांचे कर्तव्य राहील.
३. कलम तेरा नुसार, बालकास शाळेत प्रवेश देताना पालकांकडून कोणतीही देणगी, फी घेता येणार नाही.
४. कलम सोळा नुसार शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास वर्गामध्ये मागे ठेवता येणार नाही. किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.
५. कलम चौदानुसार प्रवेशाच्या वेळी बालकाच्या वयाचा पुरावा पालकास सादर करता आला नाही तर वयाच्या पुराव्याअभावी कोणत्याही बालकास शाळेमध्ये प्रवेश नाकारता येत नाही.
६. कलम सतरानुसार बालकास शारीरिक व मानसिक त्रास देता येणार नाही.
७. कलम पंचवीस नुसार कोणत्याही शिक्षकास खाजगी शिकवणी घेता येणार नाही.
८. कलम एकोणतीस नुसार बालकाचे प्रत्येक इयत्तेमध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन केले जाईल.

याशिवाय पालकांची जबाबदारी, कायदेविषयक, राज्यस्तरीय यंत्रणा, विधेयकाच्या कार्यवाही बाबतच्या तक्रारींचे निवारण या विधेयकाच्या संदर्भात केंद्र व राज्य शासनांनी विनिमय करावयाचे अधिकार या बाबतची कलमे या विधेयकांमध्ये आहेत. तसेच शाळेची प्रमाणके व दर्जाविषयक सूचीचा समावेशही या विधेयकामध्ये करण्यात आला.

प्र. २) शाळा, विद्यार्थी व समाज यांच्या संदर्भात शिक्षकाची भूमिका

* प्रस्तावना :-
शिक्षणाचा दर्जा हा शिक्षकाच्या दर्जावर अवलंबून असते. विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार करून त्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकाला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. बालकांच्या विविध अवस्था, त्यांच्या समस्या यांचे ज्ञान होण्यासाठी शिक्षकाकडे बालमानस शास्त्राचे ज्ञान हवे. शालेय जीवनामध्ये शिक्षकास अध्यापक, मित्र, पालक, रक्षक, संशोधक, समाज परिवर्तक अशा विविध भूमिका पार पाडाव्या लागत असतात. जात, धर्म, पंथ, लिंग, अपंगत्व यांचा अडसर न ठेवता सर्वांना समान शिक्षण मिळेल याकडे लक्ष दिले पाहिजे.

अ) विद्यार्थीवाढीच्या अवस्थेतील शिक्षक भूमिका :-
बालक म्हणजे प्रौढाची छोटी प्रतिकृती नव्हे. उंची, वजन, बांधा तसेच बुद्धिमत्ता, भावनाशीलता, सामाजिक व नैतिक वर्तन या बाबतीत मुलांच्या विकास होत असतो. विद्यार्थीवाढीच्या अवस्थेतील आपली भूमिका योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी शिक्षकाकडे बालमानसशास्त्राचे ज्ञान हवे. अडचणी व समस्यांचे निराकरण करण्याचे कौशल्य प्राप्त करता येते.

व्यक्ती विकासातील प्रमुख अवस्था व कालावधी
- शैशवावस्था – जन्मापासून ५ वर्षापर्यंत.
- किशोरावस्था किंवा बाल्यावस्था – ६ ते १२ वर्षापर्यंत
- कुमारावस्था – १३ ते १९ वर्षापर्यंत
- प्रौढावस्था – २० वर्षापासून पुढे.

* शैशवावस्थेत शिक्षक भूमिका (० ते ५ वर्षे) :-
शैशवावस्थेतमध्ये बालकाचा विकास अत्यंत जलद गतीने होतो. ६ महिन्यांच्या आत तो दुप्पट तर ५ वर्षापर्यंत अत्यंत जलद गतीने होतो. त्याची गती हळूहळू कमी होते. या वयोगटातील मुले सतत खेळत असतात. ती अतिशय संवेदनशील असतात. त्यांची मने कोमल व नाजूक असतात.
शैशवावस्थेतील बालकांना शिक्षकांनी चांगल्या सवयी लावाव्यात. स्वच्छतेवर भर द्यावा. बालकांकडून अनेक कृती करून घ्याव्यात. उदा:- कागद कापणे, चित्र रंगविणे, गाणी म्हणणे, खेळ खेळणे या अवस्थेत

मुलांना परीकथा सांगण्यात, तबलागीते, सांघिक गीते म्हणण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

* **किशोरावस्थेतील शिक्षक भूमिका:-**

किशोरांचा मेंदू विकास जवळजवळ पूर्ण झालेला असल्याने शाळेत जाऊन शिकविण्यासाठी ते समर्थ असतात. या वयातील मुले भराभराने बोलतात. त्यांच्यामध्ये योग्य-अयोग्यतेची जाणीव होते. प्रामाणिकपणा, समता, सहकार्य, न्यायवृत्ती यांसारख्या गोष्टी या वयात वावरताना विकसित होतात.

किशोरावस्थेत औपचारिक शिक्षणास सुरुवात होते. किशोरमध्ये नेतृत्वगुणांचा विकास करण्याचा प्रयत्न करावा. पक्षपातीपण जातीय भावना, अंधविश्वास यांपासून मुलांना दूर ठेवावे.

किशोरावस्थेतील मुलामुलींमध्ये शिक्षकाबद्दल अत्यंत आदर असतो. शिक्षकांनी कृतीद्वारा शिक्षणावर भर द्यावा. लिहिणे, वाचणे, उत्तर देणे, प्रयोग करणे, नकाशावाचन यांसारख्या अनेक कृतींना वाव द्यावा.

या वयात कारकशक्तींचा विकास साधला जात असल्याने व्यायामाची आवड निर्माण करावी.

* **कुमारावस्थेतील शिक्षक भूमिका (१३ ते १९ वर्षे):**

कुमारावस्थेतील मुलामुलींमध्ये शारीरिक, मानसिक, सामाजिक व भावनिक स्थित्यंतरे जलद रीतीने घडून येतात. हा काळ मानसिक वाढीचा आणि भावनिक ताणतणावांचा संघर्षमय काळ मानला जातो. मुला-मुलींमध्ये लैंगिक परिवर्तनाची चिन्हे दिसू लागतात.

शिक्षकांनी कुमारासोबत सहानुभूतीपूर्ण व्यवहार करावा. या अवस्थेतील मुलांना सहल, यात्रा यांद्वारे अध्ययन करण्याची संधी देणे. ज्ञानामध्ये वृद्धी होते. सामाजिक, नैतिक विकास होतो. कुमारांशी वर्तन करताना शिक्षकांनी सहकार्य, परस्पर आदरभाव यासारखी सामाजिक मूल्ये, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा, सचोटी यासारखी मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर रुजवावीत. शिक्षकांनी मुलांच्या मतांची दखल घेतली पाहिजे. त्यांना उपदेश देण्याचे टाळले पाहिजे. त्यांना आदेश न देता थोडे स्वातंत्र्य द्यावे. शिक्षकांनी मुलांना समजून घेतले तर या वादळी, संवेदनक्षम अवस्थेतून मुले सहीसलामत बाहेर पडतील.

शिक्षकांची शाळेसंबंधी भूमिका :-

शाळा ही एक प्रणाली असून या प्रणालीचा शिक्ष... हा एक महत्वाचा भाग आहे. शिक्षणाचा दर्जा हा शिक्षकाच्या...र अवलंबून असतो. विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार करून त्या...सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकाला विविध भूमिका पा...पाडाव्या लागतात.

शिक्षकांची शाळेसंबंधी भूमिका:

- मूलभूत भूमिका
- मित्रत्वाची भूमिका
- पालकत्वाची भूमिका
- रक्षकाची भूमिका
- अध्यापकाची भूमिका
- अध्ययन गतिवर्धकाची भूमि...
- संशोधकाची भूमिका.
- समाजपरिवर्तकाची भूमिका

मूलभूत भूमिका :-

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या आचार-वि...योग्य वळण लावणे. हे कार्य विद्यार्थ्यांच्या कडून प्रभावीपणे क...साठी शिक्षकांमध्ये नेतृत्वाचे गुण असावेत. शाळेतील सर्व विद्या...समानतेची वागणूक दिली पाहिजे.

मित्रत्वाची भूमिका :-

शिक्षकाने आपल्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांशी प्रे... जिव्हाळ्याने वागले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या कार्यात मित्रत्वाची भ...वून सहकार्य केले पाहिजे.

पालकत्वाची भूमिका :-

शिक्षकाने आपल्या शाळेतील विद्यार्थी हे शालेय ...चा केंद्रबिंदू आहेत याची जाणीव ठेवावी पालकत्वाच्या भूमिकेतून ...विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची काळजी घेतली पाहिजे. सर्वांगीण व...विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन प्रेम, जिव्हाळा वाढवावा.

रक्षकाची भूमिका :-

शिक्षकांनी वर्गातील वातावरण भयमुक्त राहील याकडे ...द्यावे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा. विद्यार्थ्यांना ...भावनिक व मानसिक सुरक्षितता द्यावी.

- **अध्यापकाची भूमिका :-**

शिक्षकाने आपले अध्यापन कार्य उत्तम प्रकारे पार पडले पाहिजे. अध्यापकाची भूमिका करीत असताना आपल्या विषयाचे विस्तृत ज्ञान, अध्यापन पद्धतीचे ज्ञान, मानसशास्त्राचे ज्ञान, हवे. शिक्षक हा नेहमी प्रेमळ, व्यासंगी, ज्ञानसंपन्न, कर्तव्यदक्ष, चारित्र्यसंपन्न व निपक्षपाती असावा.

- **अध्ययन ग्रनिवर्धकाची भूमिका :-**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी प्रवृत्त करावे विद्यार्थ्यांना सतत प्रेरणा देऊन उत्तेजित करीत राहावे.

- **संशोधकाची भूमिका :-**

अध्ययन- अध्यापन प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचा शोध घेऊन विविध संशोधन पद्धतींचा वापर करून त्या समस्या सोडविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहावे.

- **समाजपरीवर्तकाची भूमिका :-**

शिक्षकाची भूमिका ही समाज परीवर्तकाची असावी समाजाच्या स्थैर्यासाठी नीतिमान, चारित्र्यसंपन्न व्यक्तींची समाजाला आवश्यकता असते. अशा व्यक्ती शिक्षणातून तयार होतात.

* **शिक्षकाची समाजासंबंधी भूमिका :-**

शिक्षक हा समाजाचा घटक असतो. त्याचे समाजाशी अतूट नाते असते. शिक्षकामध्ये समाजनिष्ठा असावी. भारतात आजही रूढी-प्रियता, धर्मभोळेपणा, असमानता पाहावयास मिळते. शिक्षकाची भूमिका ही समाजपरावर्तकाची असावी. त्याच्यात सामाजिक बांधिलकीची जाणीवही हवी.

शिक्षकाने समाजसुधारकाची भूमिका करून समाजात तसेच विद्यार्थ्यांत आधुनिक मूल्ये रुजवली पाहिजेत. शिक्षक हा एक सामाजिक अभियंता असतो. त्याने आपल्या अध्यापनातून, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राचा भविष्याविषयी आस्था निर्माण करावयास हवी.

शिक्षकाला विद्यार्थी, पालक व समाज या घटकांमधील महत्वाचा दुवा म्हणून कार्य करावे लागते. समाजाच्या प्रगतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन शाळेच्या माध्यमातून करावे. उदा. पर्यावरण जागृती, वृक्षारोपण, स्वच्छ भारत अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, एड्स जनजागृती असे विविध सामाजिक व

व राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम राबवून सामाजिक गरजा व उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी शिक्षकाने सामाजिक बांधिलकीतून कार्य करीत राहिले पाहिजे. 3)

प्रत्येक समाजामध्ये व्यक्तिवर्तनाच्या बाबतीत काही नियम, संकेत, रीतिरिवाज असतात. शिक्षकाने समाजाचे सातत्य टिकविण्यासाठी व समाजाचा विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांसमोर तसेच समाजामध्ये आपले वर्तन समाजाच्या पद्धतीने राहील याची दक्षता घेतली पाहिजे. *

शिक्षणाला सामाजिक, गतिशीलतेचे महत्त्वाचे साधन मानले आहे. व्यक्ती अथवा समूह यांची एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाण्याची जी क्षमता असते त्याला सामाजिक गतिशीलता म्हणतात. अयोग्य सामाजिक वातावरणापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवून त्यांच्यावर चांगले सामाजिक संस्कार होतील याकडे लक्ष द्यावे *

3) राष्ट्रीय एकात्मता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य यांमधील शिक्षकाची भूमिका कोणती?

* प्रस्तावना :-

भारतासारख्या विशाल देशामध्ये विविध धर्म, जाती, पंथ, वंशाचे लोक राहतात. त्यांच्यात परस्परांमध्ये बंधुत्वाची, आपुलकीची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर जागतिकीकरणाच्या युगात टिकून राहण्यासाठी केवळ राष्ट्रीयत्वाची भावना पुरेशी ठरणार नाही. तर आंतरराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विकास होणेही तितकेच महत्वाचे आहे.

* राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण :

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे आपण सारे भारतीय आहोत, सारे भारतीय माझे बांधव आहेत ही भावना निर्माण करणे. भारतासारख्या विशाल देशात अनेक धर्म, पंथ, जाती, वंशाचे लोक राहतात. त्यांच्या परस्परांमध्ये लोकशाही सलोख्याची, बंधुत्वाची, आपुलकीची भावना असणे आवश्यक आहे. भारताने लोकशाही समाजवादी समाजरचना स्वीकारलेली आहे.

* संकल्पना :-

राष्ट्रीय एकात्मता ही एक भावना आहे. सामाजिक व भावनिक एकात्मता ही राष्ट्रीय एकात्मतेचीच अंगे आहेत. पंडित नेहरूंनी राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ भावनिक एकात्मतेत सांगितला.

"भावनिक एकात्मता म्हणजे आपल्या मनाची व हृदयाची एकात्मता; भावनिक एकात्मता म्हणजे वेगळेपणाची भावना नष्ट करणे."

शासनाने सर्व शालेय पुस्तकात जे प्रतिज्ञापत्र प्रसिद्ध केले आहे त्यातून राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचे यथार्थ शब्दात वर्णन केले आहे.

"भारत माझा देश आहे
सारे भारतीय माझे बांधव आहेत."

* व्याख्या :-

१. डॉ. संपूर्णानंद : "संकुचित प्रादेशिक हिताचा त्याग करून राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा दृष्टिकोन निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय."

२. डॉ. सरोजिनी रेगानी: "राष्ट्रीय एकात्मता म्हणजे लोकमानसात दृढ ऐक्यभावनेचा विकास करणे, आपण सारे एकाच राष्ट्राचे आहोत ही जाणीव परिपुष्ट करणे, व भाषा, पंथ, धर्मातीत अशी राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करणे."

* राष्ट्रीय एकात्मता संपादनात शिक्षकांची भूमिका:-

डॉ. राधाकृष्णन यांच्या मते, राष्ट्रीय एकात्मता ही काही इमारत बांधण्यासारखी बाब नव्हे तर राष्ट्रीय एकात्मतेचे संस्कार लोकांच्या अंतःकरणात हळूहळू व सूक्ष्म स्वरूपात रुजविले पाहिजेत. राष्ट्रीय एकात्मता संपादनात शाळा व शिक्षकांनी पुढील भूमिका कराव्यात.

**राष्ट्रीय एकात्मेत शिक्षकांची भूमिका:**

- अभ्यासक्रमातील विषय शिकवताना राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व विद्यार्थ्यांवर बिंबवावे. उदा:- इतिहास, भूगोल.
- भारतातील विविधतेचा - संस्कृतीचा, धर्म, चालीरिती, पोशाख इ. परिचय विद्यार्थ्यांना करून द्यावा.
- विद्यार्थ्यांच्या मनात समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, ही मूल्ये निर्माण होतील असे कार्यक्रम शाळेत घ्यावेत.
- शाळेतील भिन्न जातीचे, धर्माचे, दर्जाच्या मुला-मुलींना एकत्रितरित्या सर्वधर्मांची प्रार्थना म्हणावयास लावावी.
- राष्ट्रीय एकात्मतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये यावी यासाठी एकसारखा गणवेश असावा.
- सहलींमुळे राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक स्थळांच्या भेटींची दर्शन घडते.
- सांस्कृतिक मेळाव्यांद्वारे इतर भाषा, संस्कृती, परंपरा यांचा परिचय होण्यास मदत होते.
- विविध प्रार्थनास्थळे, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, आश्रमशाळा, बालसुधारगृहे या ठिकाणी भेट देण्याचे उपक्रम
- सामाजिक, नैसर्गिक आपत्ती, - महापूर, भूकंप इ. ओढवल्यास प्रभात फेरी काढणे, निधी गोळा करणे,
- वस्तू जमविणे, मदत करणे यांसारखे उपक्रम राबविल्यास राष्ट्रीय एकात्मता वाढीस चालना मिळते.

थोडक्यात, राष्ट्र मला काय देईल यापेक्षा मी राष्ट्रासाठी काय करू शकतो ही भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी शाळा व शिक्षकांनीनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

* आंतरराष्ट्रीय सामंजस्य :-

राष्ट्रा - राष्ट्रांतील मतभेद टाकून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी इ. स. १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. शांतते विना सुखी व संपन्न जीवन शक्य नाही याची सर्व जगाला जाणीव झाली. त्यातूनच आंतरराष्ट्रीयत्वाच्या संकल्पनेचा उदय झाला.

* संकल्पना :-

मूलत: सर्व मानवजात एक आहे. सर्वांच्या आशा, आकांक्षा, गुणदोष, सुख:दुखे समान आहेत. जगातील सर्व मानवांमधील विश्व-बंधुत्वाची भावना म्हणजे 'आंतरराष्ट्रीय सामंजस्य' होय. थोडक्यात विश्वसमुदाय ही कल्पना स्वीकारून विश्वसमाजाशी समायोजन साधणे होय.

* व्याख्या :-

१. ऑलिव्हर गोल्डस्मिथ : "व्यक्ती केवळ स्वत:च्याच राष्ट्राचीच नव्हे तर संपूर्ण जगाची सभासद आहे ही भावना म्हणजे 'आंतरराष्ट्रीय सामंजस्य' होय.

२. डॉ. लेविस वाल्टर : "व्यक्तीचे राष्ट्रीयत्व किंवा संस्कृती कोणतीही असो त्याचा विचार न करता तिचे चिकित्सक व वस्तुनिष्ठ निरीक्षण तसेच मूल्यमापन करण्याची क्षमता म्हणजे 'आंतरराष्ट्रीय सामंजस्य' होय.

'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' ही आपल्या संतांची शिकवण "हे विश्वचि माझे घर' ही कल्पना स्वीकारून विश्वसमाजाशी समायोजन साधण्याची पात्रता अंगी निर्माण करणे म्हणजे आंतरराष्ट्रीय सामंजस्य होय.

## * आंतरराष्ट्रीय सामंजस्य संपादनात शिक्षकाची भूमिका :-

आंतरराष्ट्रीय सामंजस्य शिक्षकाची भूमिका

- १. भाषेचे अध्यापन.
- २. इतिहास अध्यापन
- ३. भूगोल अध्यापन
- ४. विज्ञान
- ५. गणित
- ६. मानवी मूल्यांची जोपासना
- ७. विविध दिन साजरे करणे.
- ८. विविध स्पर्धांचे आयोजन.
- ९. सोशलमिडियाचा वापर.
- १०. संकट ग्रस्त राष्ट्रांना मदत.

१. साहित्य हे मानवी हृदयांना जोडणारी एक शक्ती असे.

२. इतिहासामुळे विविध देशांतील संस्कृतीचा परिचय होण्यास मदत होते. मानवाची सांस्कृतिक, सामाजिक प्रगती लक्षात येते.

३. भूगोलाच्या अध्यापनातून विविध देशांतील लोकांचे राहणीमान, शेती, उद्योगधंदे इ. ओळख करून द्यावी.

४. वैज्ञानिक प्रगतीमुळे जग कसे जवळ आले आहे याची माहिती विद्यार्थ्यांना करून द्यावी.

५. विद्यार्थ्यांना विविध देशांतील लोकांचे स्वभाव, गुणधर्म, राहणीमान, आहार, पोशाख इ. विषयी माहिती देता येईल.

६. शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय दिन, यूनो डे, मानवी हक्क दिन, पर्यावरण दिन, जागतिक आरोग्य दिन, यांसारखे विविध दिन वैशिष्ट्यपूर्ण रित्या साजरे करून आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे महत्व विद्यार्थ्यांवर बिंबवता येईल.

७. आंतरराष्ट्रीय दर्जाचे सांस्कृतिक, कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद सांचे चर्चा यांसारखे स्पर्धांचे आयोजन करणे.

८. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात एका देशातील विद्यार्थी दुसऱ्या देशातील विद्यार्थ्यांशी सोशल मिडियाद्वारे जोडले आपले विचार कल्पना, माहिती यांची देवाणघेवाण करू शकतात.

९. संकटग्रस्तांना मदत करणे. उदा. भूकंप, दुष्काळ, महापूर.

थोडक्यात, एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ही वृत्ती प्रत्येक राष्ट्रामध्ये निर्माण झाली तर मानवाचा उच्चतम विकास साधता येईल.